# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

**सायबर सेल**

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# संकल्प - सायबर सारथी

सायबर क्राईमच्या वाढत्या घटना आणि त्यादवारे होणारी नागरिकांची फसवणूक यांच्या तपासादरम्यान एक महत्वपूर्ण बाब लक्षात आली आहे की, सायबर स्पेस मध्ये वावरताना काय काळजी घ्यावयाची आहे? याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता आणि त्याबाबत करावयाच्या उपाययोजना यांसारख्या माहितीचा अभाव आहे. या डिजिटल युगात दैनंदिन व्यवहार करताना, स्वतःची डिजिटल ओळख वापरताना घ्यावयाची खबरदारी, सुरक्षा आणि त्याचे उपाय आणि अपाय यांच्या अज्ञानामुळे, त्याबाबतच्या उदासीनतेमुळे अनेक नागरिक सायबर गुन्ह्याला बळी पडत आहेत.

गुन्ह्याची उकल करण्याची जबाबदारी पार पाडत असताना गुन्हे घडू नयेत म्हणून नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्याचा संकल्प सायबर सेल. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी केला आहे, त्यासाठी सायबर सेल कडून या नवीन वर्षाच्या दर सोमवारी **सायबर सारथी** हे डिजीटल साप्ताहिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. यामध्ये वेळोवेळी घडणारे साइबर अपराध आणि त्याची कार्यपद्धती आणि त्या अनुषंगाने घ्यावयची काळजी तसेच सायबर स्पेस मध्ये वावरताना घ्यावयाची खबरदारी याबाबत नियमित माहिती प्रसिद्ध करण्यात येईल. या माहितीचा वापर करून आपण स्वतःचे सायबर गुन्ह्यापासून संरक्षण करून आपले नातेवाईक आणि मित्र परिवार यांना याबाबत माहिती द्यावी. सदर डिजिटल साप्ताहिक त्यांच्यासोबत सामायिक करून सायबर अपराधाबद्दल इतरांना जागरूक करण्यास आपले योगदान द्याल ही अपेक्षा.

शुभेच्छांसह

**कृष्ण प्रकाश (भा. पो. से.)**

पोलीस आयुक्त,

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# क्यूआर कोड स्कॅम



क्यू आर कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड. हा कोड मोबाईल अथवा तत्सम उपकरणाच्या साहाय्याने स्कॅन करून त्यातील माहिती वाचता येते. त्याकरिता मोबाईल कॅमेऱ्याच्या साहाय्याने हा कोड स्कॅन केला जातो. तो कोड स्कॅन झाल्यानंतर त्यात दडलेली महत्वपूर्ण माहिती उघड होते. डिजिटल पेमेंट करिता याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे अगदी चहाच्या छोट्या दुकानापासून ते मोठ्या शॉपिंग सेंटरमध्ये **Physical contact** टाळून सहज आणि सोप्या पद्धतीने खरेदीची बिलं अदा करण्यासाठी याचा वापर होतो. संबंधित ठिकाणचा क्यू आर कोड आपल्या मोबाईल मधील **Google pay** आणि तत्सम पेमेंट ॲप्स वापरून स्कॅन करायचा, बिलाची रक्कम नमूद करून आपला यूपीआय पीन दाखल करून काही क्षणात आपला व्यवहार पूर्ण होतो.

क्यू आर कोड वापरून होणाऱ्या व्यवहारात **पैसे देणारा** म्हणजे ज्यांना ते द्यायचे आहेत त्यांचा **क्यू आर कोड स्कॅन करतो.** पैसे घेणाऱ्याला क्यू आर कोड स्कॅन करण्याची गरज नाही.

सायबर सेल येथे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ज्यामधे वापरकर्त्यांचा क्यू आर कोड वापरून होणाऱ्या व्यवहाराच्या अज्ञानामुळे त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

# कशी होते फसवणूक ?



## प्रसंग १-

एका दिवाळी फराळ बनविणाऱ्या महिला बचत गटाच्या एका महिलेला फोन आला, आणि फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले की तो भारतीय सेनेचा अधिकारी असून त्यांना यावेळी सीमेवरील सैनिकांना दिवाळी फराळ पाठवायचा आहे. त्याकरिता दिवाळी फराळाची विचारपूस करून त्याने फराळाच्या विविध प्रकारची मागणी केली. त्याचे बिल देण्याकरिता म्हणून संबंधित महिलेला एक क्यू आर कोड पाठवून तो स्कॅन करण्यास सांगितला. यावर स्पष्टीकरण म्हणून सांगितले की हा सेनेचा नियम आहे आणि त्या व्यक्तीवर विश्वास ठेवून सदर महिलेने जेव्हा तो कोड स्कॅन केला तेव्हा तिच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा होण्याऐवजी त्यातून ५०,००० रु. वजा झाले.

## प्रसंग २ -

एक आय.टी. अभियंता तरुण त्याच्याकडे असणारा डीएसएलआर ( DSLR) कॅमेरा, त्याचा वापर होत नसल्याने त्याच्या विक्रीची जाहिरात ओएलएक्स (OLX) या खरेदी-विक्रीच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केली. ती जाहिरात पाहून त्याला खरेदीदाराकडून संपर्क केला गेला, कॅमेरा ची प्राथमिक माहिती घेतल्यानंतर खरेदीदाराने २५,००० रुपयांना तो कॅमेरा विकत घेण्याची तयारी दर्शविली. त्या तरुणाकडून त्याच्या बँकेच्या खात्याची माहिती खरेदीदाराने घेतली आणि काही वेळात त्याने त्याच्या बँकेतून पैसे ट्रान्सफर करताना काही अडचणी येत आहेत असे सांगून एक क्यू आर कोड स्कॅन करण्यासाठी पाठवला. अपेक्षित किंमत मिळत असल्याने आनंदात क्यू आर कोड स्कॅन करून स्वतःचा यूपीआय पीन दाखल करून त्या तरुणाने ८९,९९९ रु. गमावले.

# फसवणूक कशी टाळाल ?



## क्यू आर कोड चा वापर करून आर्थिक व्यवहार करताना पुढील बाबी लक्षात ठेवा-

1. पैसे देणारा व्यक्ती हा पैसे देण्याकरिता स्वतःच्या यूपीआय किंवा मोबाईल वॉलेटचा वापर करून क्यू आर कोड स्कॅन करतो आणि युपीआय पीन दाखल करून पैसे ट्रान्सफर करतो. **पैसे घेण्याकरिता कोणताही क्यू आर कोड स्कॅन करण्याची गरज नाही.**

२. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवून त्यांच्याकडून व्हाट्सऍप किंवा इतर माध्यमातून प्राप्त झालेले क्यू आर कोड स्कॅन करू नका.

३. सायबर गुन्हेगार पुढील कारणे सांगून तुम्हाला संपर्क करू शकतात-

- मोबाईल वॉलेटची कॅशबॅक ऑफर प्लेस करण्यासाठी
- तुम्ही ओएलएक्स वर विक्री करिता जाहिरात केलेली वस्तू खरेदी करण्याकरिता त्याची किंमत अदा करण्याचे कारण सांगून
- तुमच्याशी असणाऱ्या आर्थिक व्यवहारामध्ये तुमचे पैसे देण्याच्या बहाण्याने
- हॉटेल किंवा ट्रॅव्हल बुकिंग करण्याच्या बहाण्याने

# सावध व्हा, सुरक्षित रहा.

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**

**Contact No.- 020- 27350939**